# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी 'श्रीनिवास कुलकर्णी यांचे ललितगद्य लेखन' ('डोह', 'सोन्याचा पिंपळ', 'पाण्याचे पंख', 'कोरडी भिक्षा') या प्रस्तुत विषयावरती लघुप्रबंध सादर करताना मला अत्यंत आनंद होतो आहे. या संशोधन प्रसंगी ज्यांचे अनमोल असे सहकार्य लाभले त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे परम कर्तव्य समजतो.

या लघुप्रबंधाच्या विषय निवडीपासून ते त्याच्या पूर्णत्वापर्यंत माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. रणधीर शिंदे यांचे लाभलेले अनमोल असे मार्गदर्शन माझ्यासाठी नेहमीच अत्यंत प्रेरणादायक ठरले. सरांचा सहानुभुतीपूर्वक, प्रेमळ असा स्वभाव, प्रत्येक गोष्ट तपशीलाने समजावून सांगणे, कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी नेहमीच तत्पर आणि प्रत्येक गोष्टीच्या मूळाशी जावून त्यांचा सारासार विचार करणे हे सर्वच माझ्या लघुप्रबंधाच्या यशस्वी पूर्णत्वाचे खरे गमक ठरले. सरांचे हे अनमोल मार्गदर्शन मला उत्तरायुष्यातही अत्यंत लाभदायक ठरेल यात कसलीच शंका नाही. आदरणीय सरांचे हे ऋण मला शब्दांत व्यक्त करता येणार नाहीत त्यामुळे मी त्यांच्या ऋणातच राहणे अधिक पसंत करेन.

याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर, प्रा. डॉ. कृष्णा किरवले आणि हिमांशू स्मार्त सर यांच्याशी विषयासंदर्भात केलेली चर्चा आणि त्यासंदर्भात मिळालेले मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. तसेच विद्यापीठातील डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातून विपुल प्रमाणात मिळालेल्या संदर्भ ग्रंथामुळे हे संशोधन कार्य सुलभ होऊ शकले. याबद्दल त्यांचेही आभार.

माझ्या एकूणच आतापर्यंतच्या शिक्षणामध्ये आणि या लघुप्रबंधाच्या पूर्णत्वामध्ये सिंहाचा वाटा असणारी व्यक्ती म्हणजे माझी आई (मम्मी). केवळ मी शिक्षण घ्यावे या एकमेव उद्देशासाठी अतोनात कष्ट उपसणाऱ्या माझ्या आईच्या विलक्षण जिद्दीमुळेच मी इथपर्यंत पोहचू शकलो. तसेच माझ्यावर मुलाप्रमाणे प्रेम करणारे माझे मामा प्रा. पी. एस. चौगुले आणि मामी सौ. सुचिता चौगुले यांनी सुरूवातीपासूनच माझ्या शिक्षणाबद्दल दाखविलेली आस्था, केलेली सर्वतोपरी मदत आणि मिळालेले अनमोल मार्गदर्शन हे ही माझ्यासाठी तितकेच अनमोल ठरले. या सर्वांच्या ऋणातून मला आयुष्यभर उतराई होता येणार नाही. हे ही तितकेच खरे.

तसेच वडीलांचे डोक्यावरील छत्र हरपल्यानंतरही ही कसर भरून काढणारे आणि मला कसलीच उणीव भासू न देणारे माझे आजी - आजोबा (सौ. आक्काताई सदाशीव चौगुले) आणि मामा-मामींचे मन:पूर्वक आभार. त्यांनी नेहमीच दिलेले सहकार्य आणि प्रोत्साहन हे ही मला मार्गदर्शक ठरले. तसेच शिवाजी विद्यापीठातील माझे मित्र अनिरूद्ध काळे, शीतल पाटील, सचिन आवताडे, विजय बेदरे, संतोष बोंगाळे, संतोष काळे, समीर कोळी, योगेश्वर चव्हाण तसेच सुवर्णा चव्हाण यांचेही सहकार्य मिळाले. तसेच मुद्रित शोधनाचे महत्त्वाचे कार्य करणारे माझे मित्र नामदेव गपाटे आणि या लघुप्रबंधाच्या टंकलेखनाचे काम वेळेत पूर्ण करून देणारे श्री. अमर धनवडे यांचेही मन:पूर्वक आभार.

वरील सर्वांच्या अनमोल सहकार्याबद्दल पुन:श्च आभार!